CNR No. MHOS-02000079-2018

<u>एल.ए.आर.क्र. १/२०१८ मधील नि.क्र.२३ वरील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज जाबदार यांनी हरकतदार व साक्षीदार यांचा उलट तपास घेणेसाठी व झालेली कॉस्ट भरणेकरीता मुदत मिळणेसाठी दिला आहे. जाबदार यांच्या म्हणण्यानुसार त्यांचे वकील खाजगी कामानिमित्त परगावी गेले आहेत त्यामुळे उलट तपासासाठी मुदत मागत आहेत. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. तक्रारदार यांनी सदर अर्जास जोरदार हरकत घेतली.

३. प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | जाबदार यांनी मागणी केल्यानुसार उलट तपास घेणेस व कॉस्ट भरणेकरीता मुदत मिळणेस पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

<u>का र ण मी मां सा</u>

४. सदर मुळ अर्ज तक्रारदार व जाबदार यांचे संपादीत जमिनीच्या नुकसान भरपाई मध्ये हिस्से ठरवण्याकरीता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ कलम ३ एच (४) नुसार दाखल आहे. आज रोजी केस हरकतदार प्रभावती हिचे उलट तपासासाठी आहे व साक्षिदार हजर आहे. परंतु सदर प्रकरण गुणदोषावर निकाली करण्यासाठी जाबदार यास उलट तपासासाठी शेवटची संधी देणे योग्य आहे पण जाबदार याचेवर खर्च बसविणे योग्य आहे. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज रक्कम रु.२५०/– खर्च जाबदार याने हरकतदार नं.१ यांना देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. जाबदार यांनी पुढील तारखेस उलट तपास घ्यावा.

Digitally signed by Vaibhav Bajrang Ghadge
Date: 2020.02.17 16:51:16 +0530

**(व्ही.बी.घाडगे)**

दिनांकः– १३/०२/२०२० ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
उस्मानाबाद.